Annexure - VII

**प्रकल्प प्रवर्तक मा. कार्यकारी अभियंता, म्हैसाळ पंप हाऊस, विभाग-॥, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली व सोलापूर, महाराष्ट्र या म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजना ( ६५ गावे ) प्रकल्पा बाबतच्या जाहीर लोकसुनावणीचे इतिवृतांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक मा. कार्यकारी अभियंता, म्हैसाळ पंप हाऊस, विभाग-॥, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली व सोलापूर, महाराष्ट्र या म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजना ( ६५ गावे ) प्रकल्पा बाबतची जाहीर लोकसुनावणी बुधवार, दिनांक १७ मे, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता भीमा यात्री निवास ह़ॉल, गुड्डापूर, श्री धानम्मादेवी देवस्थान परिसर, ता-जत, जि-सांगली- ४१६४१२, महाराष्ट्र, येथे घेण्यात आली.

श्री. नवनाथ एस.अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विजयसिंह पाटील, अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक ०१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण

विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रकल्प प्रवर्तक मा. कार्यकारी अभियंता, म्हैसाळ पंप हाऊस, विभाग-II, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली व सोलापूर, महाराष्ट्र या म्हैसाळ विस्तारीत जत उपसा सिंचन योजना ( ६५ गावे ) प्रकल्पा बाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे दिनांक ०६ एप्रिल २०२३ रोजी प्राप्त झाला होता.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचने नुसार संवर्ग १ (सी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास मंत्रालय पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सदरहू प्रकल्पास मंत्रालय पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकार नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०६ जानेवारी २०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ६ मार्च २०२३ रोजी प्रदान केली.

मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी सदरची जनसुनावणी बुधवार दिनांक १७ मे, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र

प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना २००६ व सुधारित अधिसुचना २००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई .२९ / २०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०४२६ - एफटीएस ०२२ दिनांक २६-०४-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली त्यानुसार सुनावणीस खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) मा. श्री. विजयसिंह पाटील, - **अध्यक्ष**
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सांगली.
( प्रतिनिधी – मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली. )

२) मा. श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर.

३) मा. श्री. नवनाथ सं. अवताडे, - **आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,सांगली यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक "दैनिक सकाळ" मध्ये मराठी व राष्ट्रीय वृत्तपत्र "टाईम्स ऑफ इंडिया" मध्ये इंग्रजी भाषेमध्ये जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक १५-०४-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे रादरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहिती व अभ्यासाकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.

२. जिल्हा उदयोग केंद्र, उदयोगभवन, सांगली.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.

४. क्षेत्रिय निदेशालय ( पुणे ) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, ( पर्यावरण, वन, एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार ), सर्व्हे नं. ११०, धनकुडे मल्टीर्पपज हॉल, बानेर रोड, पुणे-४११ ०४५.

५. उप सचिव,पर्यावरण विभाग,नवीन प्रशासन भवन,१५ वा मजला,मादाम कामा मार्ग,मंत्रालय,मुंबई - ३२.

६. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल, सायन पूर्व, मुंबई.

७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, उदयोग भवन, कोल्हापूर.

८. तहसिल कार्यालय, जत, ता. जत, जि.सांगली, व अपर तहसिलदार, संख, ता.जत, जि.सांगली.

९. ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आचकनहल्ली, अक्कलवाडी, अंकलगी, असांगी जत, असांगी तुर्क, बालगाव, बसर्गी, बेलोंडगी, भिवर्गी, बिलूर, बोर्गी बी.के, बोर्गी ख, दरिबडाची, दरिकोनूर, धुळकरवाडी, गिगाव, गोंधळेवाडी, गुड्डापूर, गुगवड, गुलगुंजाळ, हल्ली, जाल्याल बी.के, जाल्याल, ख, जत, कागनारी, करंजगी, कारजनगी, करेवाडी, करेवाडी (को), खंडनल, खिलारवाडी, खोजनवाडी, कोलगिरी, कोनबागी, कोंट्या बोबलाड, कुलालवाडी, लमानतांडा, लमानतांडा, लवंगा, माडग्याळ, मल्लाल, माणिक नल, मोरबगी, मोटेवाडी, मोटेवाडी, मुचंडी, निगडी ख, पांढरेवाडी, पांडोझरी, रामपूर, सलमलगेवाडी, संख, सिद्धनाथ, सिंदूर, सोनलगी, सोन्याल, सोर्डी, सुसलाद, तिकोंडी, तिल्याल, उमदी, उमराणी, उटगी, वासपेठ, वाशन ता. जत, जि. सांगली.

आजपर्यंत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांचेकडे कोणत्याही लेखी सूचना प्राप्त झाल्या नसल्याचे सांगीतले.

तथापि आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेमार्फत केंद्र शासनास सादर करण्यांत येईल. तदनंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण करताना सांगितले की सांगली जिल्ह्यातील जत तालुका हा दरवर्षी अवर्षणग्रस्त राहिलेला आहे. दरवर्षी येथील जनता दुष्काळाने त्रस्त आहे. या गावांना पाणी देणेबाबत लोकप्रतिनिधी व शेतक-यांची मागणी ही अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. जत तालुक्यातील पुर्णतः वंचित ४८ गावे व मूळ योजनेतून अंशतः १७ गावे अशा एकूण ६५ गावांना एकाच योजनेतून सिंचनाचा लाभ देण्यासाठी सदरहू योजना आखली असून योजनेचे तीन टप्पे असून चार पंप आहेत. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या प्रस्तावित सुधारित प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावित म्हैसाळ विस्तारित जत उपसा सिंचन योजनेचा समावेश केलेला आहे.

सादरीकरणानंतर आयोजक ,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी कांही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार/ पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे:-**

१. **<u>श्री आप्पाराया बिराजदार, अध्यक्ष, जत तालुका काँग्रेस कमिटी.</u>**

प्रश्न- अंशतः वंचित गावांमध्ये काही ठिकाणी ३"व २" पाईपलाईन्स टाकण्याचे काम चालू आहे. चेंबर टाकण्याचेही काम चालू आहे. तर अंशतः वंचित १७ गावे तर पूर्ण वंचित ४८ गावे आहेत. तर अंशतः वंचित गावात जे साठवण तलाव आहेत, पाझर तलाव आहेत, तर तलाव भरण्याची सोय केलेली आहे काय?

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की मुळ म्हैसाळ योजना जी होती, तिचे वितरण प्रणाली संकल्पन सिंचन क्षेत्रावर आधारीत होते त्यामुळे बंदिस्त नलिकेचा व्यास क्षेत्रावर अवलंबून होता. प्रस्तावित विस्तारीत म्हैसाळ उपसा सिंचन योजनेत जत तालुक्यातील २६,५५० हेक्टर क्षेत्रासाठी ३.५ टिमसी पाण्यामधून बंदिस्त नलिका द्वारे संकल्पित होवून सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे योजनेसाठी अतिरिक्त १.५ टीएमसी पाणी तलावात पाणी सोडणेकरिता आहे. त्याचे संकल्पन तलावाची साठवण क्षमता, उपलब्ध असणारे पाणी, एकूण तलाव संख्या इत्यादी तांत्रिक बाबी पडताळून करण्याचे नियोजन आहे. श्री बिराजदार पुढे म्हणाले की जत तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. रब्बी व खरीपात पेरणी ज्वारी, गहू ही पिके घेतली जातात. तर चार दिवस पाणी दिले व नंतर पीकाला १५ दिवसांनी पाणी लागेल, याची सोय होणार आहे का. कारण महिना-दोन महिना पाणी आले नाही, तर पीके वाळण्याची शक्यता जास्त आहे.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की मागच्या दोन वर्षापूर्वी पावसाचे प्रमाण चांगले होते. त्यामुळे आवर्तन कमी झालेली आहे. यावर्षी फेब्रुवारीत आवर्तन झाले होते. इतर वेळी आपली प्रकल्पीय तरतूद व मागणीप्रमाणे ३-४ आवर्तने होणार आहेत. म्हणजे

लाभ क्षेत्रातील पाणी संपायच्या आत दुसरे आवर्तन होईल. याचे नियोजन केले जाईल. श्री बिराजदार यांनी विचारले की जर बागायती शेती असली तर आठ दिवसांनी पाणी लागेल.

प्रकल्पाचे अधिकारी यांनी सांगितले की क्षेत्राप्रमाणे असणा-या ऑउटलेटच्या बहुतोंडीला पाईपव्दारे शेतक-यांच्या शेततलावा नजिक जोडण्यात येईल. उदा-५०,००० लिटर शेततलावनजीक साठवण होत असेल, तर क्षेत्रानुसार पाणी तेवढे पाणी उपलब्ध करण्यात येईल. पुढच्या आवर्तनावेळी तसेच करण्यात येईल.

श्री बिराजदार यांनी सांगितले की शासनाने शेततलावासाठी रुपये ५०,०००/- निधीची तरतुद केली असती, तर सर्वांनी बांधले असते. कारण जेथे बागायती शेती केली जाते, द्राक्षबागा आहेत, जेथे बारमाही पाणी उपलब्ध तेथेच शेत तलाव बांधलेले आहेत. इतरांनी बांधलेले नाहीत, ते बांधणे आवश्यक आहे. तरी जनतेची मागणी आहे की शेततलाव बांधण्यास शासनाकडून निधीची तरतुद करण्यात यावी.

प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की,प्रकल्पाच्या संकल्पनाला पूरक असणारे विकेंद्रित साठे (शेत तलाव) जास्तीत जास्त होणेसाठी प्रस्ताव सादर केला जाईल. सदर शेत तलाव जास्तीत जास्त शासकीय योजनांतून अनुदानातून कार्यक्रमातून करणेबाबत कळविणेत येईल.

२) <u>श्री विक्रमदादा सावंत, मा. आमदार, जत विधानसभा.</u>

प्रश्न- पहिली जी म्हैसाळ योजना आहे, आता उन्हाळा सुरु होऊन दीड महिना झाला. आता ही काही आपली विस्तारित ६५ गावांसाठी योजना आहे, तर या सर्व गावातील तलाव, तळी, बंधारे असतील तर ते प्रामुख्याने भरण्यात यावेत. नकाशात जो यल्लो झोन दाखविला, तो सगळाच भिजणार असे दिसते. एकीकडे १७ गावे ही अंशतः दिसतात, पण नकाशात पाहिले, तर पूर्ण क्षेत्र हे भिजलेले दिसते. आताच सांगण्यात आले की ही

म्हैसाळ योजना आहे, त्याचा शेवटचा आऊटलेट पाहिल्यास तो ६" व ८" आहे. तर पाणी साठवण्यासाठी शेततलावाची तरतुदकेली, तरच या योजनेचा काही फायदा होईल. नकाशात बघितले तर शंभर टक्के क्षेत्र ओलिताखाली येणार असे दिसते. तरी जनतेची दिशाभूल होऊ नये हीच आमची मागणी आहे. तरी या योजनेतून शेत तलावाची तरतुद होणे गरजेचे आहे.

जत तालुक्यातील विस्तारित म्हैसाळ योजनेचे पूर्ण लाभक्षेत्र अचूकरित्या छोटया नकाशावर दाखवणे किचकट आहे. त्यामुळे नकाशात दाखवलेले क्षेत्र हे प्रतिकात्मक असून पिवळया रंगातील उंचावरचे क्षेत्र, गावठाण, वस्त्या इत्यादि हे लाभक्षेत्रात येत नाहीत. तथापि, प्रकल्पांत सिंचन क्षेत्र २६५०० हे. (लागवडी लायक क्षेत्र CCA ८८३३३ हे.) साठी वितरण प्रणाली केली जाईल. शासनाच्या विविध योजनांव्दारे शेततलावांचे जास्तीत जास्त जाळे निर्माण करणेसाठी शासनास प्रस्ताव ससादर करणेत येईल. असे केल्याने प्रकल्पाच्या संकल्पनाला पूरक पाणीसाठयांचे जाळे निर्माण होऊन सूक्ष्म सिंचनाला चालना मिळेल.

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की पाझर तलाव, लहान तलावानुसार प्रकल्पाचे आरेखन (design) केलेले आहे. बैठकीत सूचना केल्याप्रमाणे शेत तलावाची तरतुद करण्याबाबत प्रयत्न करण्यांत येईल, कारण आपल्याला शेत तलावाचे जाळेच करायचे आहे.

३) <u>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती.</u>

प्रश्न- यामध्ये एलो ( पिवळे ) क्षेत्र दाखविले आहे, ते साधाणतः २६,५०० आहे. ते एका गावचे आहे वा ६५ गावाचे आहे?

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की सर्व ६५ गावांसाठी एलो ( पिवळे ) क्षेत्र दाखविले आहे जतची जी टोपोग्राफी आहे ही काही ठिकाणी खडकाळ, काही ठिकाणी जुना भाग

(एरिया), गावठाण काही ठिकाणी उंचवटे, काही ठिकाणी उंच. वगळून तर आपण एलो ( पिवळे ) रंग हा संपूर्ण ८८,३३३ हेक्टरसाठी दिलेला आहे. सर्व क्षेत्र (लाभ क्षेत्र व लाभ क्षेत्राबाहेरचे) छोटया नकाशात दाखवणे शक्य नसल्याने पिवळा रंग हा सर्व क्षेत्रात प्रतिकात्मक लाभक्षेत्र म्हणून दाखवला आहे. तथापि लाभक्षेत्र २६५०० हे. लागवडीखालील क्षेत्र (CCA ८८३३३ हे.) आहे.

४) **<u>श्री अंकुश हुवाळे, शिवसेनाप्रमुख, जत.</u>**

प्रश्न- आपल्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार पूर्ण वंचित असणारी ४८ गावांची यादी मिळाली. तरी विनंती करण्यात येते की या ४८ गावात किती तलाव आहेतव कुठले कुठले तलाव भरले जाणार आहेत याची माहिती देण्यात यावी. १७ गावे अंशतः वंचित दाखविण्यात येतात. तर लवंगा व व्हसपेठ हे ३०-३५ कि.मी. अंतरावर आहे. तरीही अंशत: गाव म्हणून कसे समाविष्ट करण्यात आले? वंचित गाव दाखविण्याचा उद्देश काय आहे? तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यावर कुठल्या कुठल्या गावांना पाणी देण्यात येईल याची माहिती देण्यात यावी.

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की लाभक्षेत्रातील तांत्रिकदृष्टया व पाणी उपलब्ध असलेने जिथे जिथे शक्य असेल तिथले तलाव असतील, तिथे पाणी सोडण्यात येणार आहेत. पाझर तलाव, लघुपाटबंधारे आहेत, तेथे पाणी सोडण्यात येणार आहे.

मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिकारी यांना प्रत्येक गावात किती तलाव व कुठल्या तलावात पाणी सोडण्यात येईल याची यादी पुरविण्याची आणि प्रश्नकर्त्यांना अंशतः वंचित व पुर्ण वंचित याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे अशी सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की ४८ गावांना म्हैसाळ योजनेचा काहीही फायदा होत नव्हता. म्हणून ती वंचित धरण्यात आली. १७ गावे अंशतः म्हणजे एखाद्या

गावाचे क्षेत्र जर ४,००० हेक्टर असेल व त्यातील प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र ५० किंवा १०० एकर असेल किंवा पूर्विच्या प्रकल्प अहवालामध्ये सदरचे गांव समाविष्ठ असेल तर ते अंशतः धरण्यात आले आहे. तथापि, सर्व वंचित (अंशत: व पूर्ण) गावांना पाणी देणेचे नियोजन आहे.

श्री. अंकुश हुवाळे यांनी अंशतः गाव व त्यातील अंतर याबाबत आक्षेप नोंदविला.

अध्यक्ष यांनी सूचना केली की जरी एखादे गाव अंशतः जरी असले, तरी तेथे पाणी दिले जाणार नाही असा अर्थ होत नाही.

५) **<u>श्री लक्ष्मण कोरे, राहणार-माडग्याळ, तालुका-जत, जिल्हा-सांगली.</u>**

प्रश्न- व्हसपेठ तलावातील व गुड्डापूर तलावात पाणी सोडल्यास ओढ्यातून माडग्याळ व इतर परिसरात पाणी मिळू शकते अशी मागणी केली.

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की विस्तारित योजनेत समाविष्ठ ६५ गावांतील वंचित भागाचा समावेश आहे. तसा शासनस्तरावरिल निर्णय झाला आहे.

६) **<u>श्री एस. एस. वाली, राहणार-सोरडी,ता-जत, जि-सांगली.</u>**

प्रश्न- म्हैसाळ उपसा सिंचन योजनेत ६५ गावांचासमावेश आहे. ४८ गावे हे पूर्णतः वंचित आहेत, तर १७ गावे हे अंशतः वंचित आहेत. तर कोणकोणती १७ गावे वंचित आहेत, त्याची माहिती देण्यात यावी. त्यांनी पुढे मागणी केली की पाच एकरपर्यंत शेततळी अनुदान मिळतो. तर ज्याच्याकडे १५-२० एकर पर्यंत शेत असणा-यांनाही शासनाकडून शेततळी अनुदान देण्यात यावा.

उत्तर- जलसंपदा विभागाकडून अनुपालनात्मक नाही. तथापि नोंद घेणेत येत आहे.

७) **<u>श्री. अंकूर,रा.धुळकरवाडी, तालुका-जत, जिल्हा-सांगली.</u>**

प्रश्न- माझ्या गावची जमिनीची रचना अशी आहे तेथे जमिन ही उतारावर आहे. तेथे ६-७ कि.मी. पर्यंत पाणी येऊ शकत नाही.पाणी साठवण करण्यासाठी कोणताही तलाव नाही तरी माझ्या गावाला पाणी मिळण्याची व्यवस्था काय आहे?

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की तेथे एक आऊटलेट ठेवता येईल. शेत तलावांचे जाळे होईल असा प्रयत्न करण्यात येईल व याबाबत नोंद घेण्यात येत आहे.

८) **श्री. बसवराज बिराजदार,रा. उटगी, माजी सरपंच, ता-जत, जि-सांगली.**

प्रश्न- आताच्या घडीला एकही शेतकरी संतुष्ट नाही. आम्हांला कधिही पुरेसे पाणी मिळत नाही. येथे फक्त तोंडी चर्चाच चालू आहे. दोन दिवस पाणी येते, तिथेच संपते. पुढच्या माणसाला योजना पोहचतच नाही. पाण्यासाठी येथील लोकांना मारामारी करावी लागते.

त्यांनी पुढे सांगितले की बंधिस्थ पाईपलाईनमुळे पिण्याच्या पाण्याच्या पाईपालाईन गाळ, नारळ यामुळे चोकअप व्हायला लागल्या आहेत. आताशीतर एकच आवर्तन पूर्ण होत आहे, तर हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर हा त्रास कशावरुन होणार नाही?

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, आतापर्यंत या भागात यापूर्वी दोनवेळा पाणी देण्यात आली असून, बंदिस्त नलिका ही नाविण्यपूर्ण संकल्पना असून जसा अनुभव येतो, त्याप्रमाणे मार्ग काढण्यात येतो. ओपन कॅनॉलमधून बंधिस्थ पाईपलाईनमध्ये पाणी जाण्याच्या ठिकाणी जाळी लावण्यात आली आहे. तसेच आवश्यक ठिकाणी स्कोर व्हाल्वची व्यवस्था करण्यात आली आहे. जिथे जाळी लावायची राहिली आहे तिथे बसविण्यात येईल. त्यामुळे गाळ, नारळ, प्लॅस्टिकचे तुकडे न अडकण्याची व सुरवातीलाच अटकाव करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

९) **श्री विक्रमदादा सावंत, मा.आमदार, जत विधानसभा.**

प्रश्न- जत तालुक्याचे क्षेत्रफळ हे २,२७,००० हेक्टर आहे. पहिले जे म्हैसाळचे काम झाले आहे, तर मुळ क्षेत्र, २२,५५० हेक्टर क्षेत्रफळ भिजणार आहे. नविन योजनेमुळे जवळजवळ ४९,०००हेक्टर फक्त ओलिताखाली येते. आज २२-२५ वर्षे झाली, मुळ योजनाच पूर्ण नाही. तर विस्तारित योजना पूर्ण होण्याचा कार्यकाल किती लागेल?

आताच बैठकीत माजी सरपंच बिराजदार यांनी सांगितलेच की आजही पूर्ण क्षमतेने पाणी दिले जात नाही. जर या भागाला पूर्ण क्षमतेने शेवटच्या टप्प्याला पाणी द्यायचे असेल व तशी प्रशासनाची मानसिकता असेल, तर ती योजना पूर्ण क्षमतेने राबविलीच, तर अशक्य काहीही नाही.

मा. आमदार विक्रमदादा सावंत यांनी प्रकल्प अधिकारी यांना पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी किती क्युसेस पाणी सोडावे लागेल व त्यास किती पंप लागतील अशी विचारणा केली.

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की पाचव्या टप्प्याला ९ (नऊ) पंप आहेत व सध्याच्या विकसित लाभक्षेत्रासाठी ३५० क्युसेक्स विसर्ग आला, तर ही सद्य:स्थितीत योजना मागणीस पूरक क्षमतेनेचालू शकते.

मा. आमदार विक्रमदादा सावंत यांनी मत मांडले की पहिली मूळ योजना लवकरात लवकर पूर्ण व्हावी. त्यांनी प्रकल्प अधिकारी यांना विचारले की विस्तारित संपुर्ण योजना पुर्ण होण्याचा कालावधी किती असेल?त्यांनी सांगितले की संपूर्ण जत तालुका हा कायमच अवर्षणग्रस्त राहिलेला आहे. या कायमस्वरुपी अवर्षणग्रस्त भागात पिण्याच्या पाण्यासाठी टंचाईमधून खर्च करत आहात, तर त्याचप्रमाणे जी काही पाणीपट्टी येईल, एमएसईबीचे बील असेल, तर टंचाईच्या काळातील पैसे खर्च करत आहे, दरवर्षी ७-१३ कोटी दरवर्षी टंचाईकाळात खर्च करत आहेत, तर ती योजना

पूर्णत्वास आल्यानंतरच टंचाईखर्चातूनच शेतक-यांना पाणी देण्यात यावे. म्हणजे शेतक-याला आर्थिक मोबदला भरायला लागू नये.

मा. आमदार यांनी प्रश्न केला की जी मुळ योजनाआहे, ती आजपावेतो पूर्ण का झाली नाही व किती दिवसात पुर्ण करणार आहात?नंतर विस्तारित योजनेबाबत माहिती सांगण्यात यावी.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की मूळ योजना ही साधारणतः १-१ १/२ वर्षात पूर्ण होईल. जी काही उरलेली काम असतील, ते एक-दीड वर्षात पूर्ण होतील. तर विस्तारित योजना दोन टप्प्यात पूर्ण करत आहोत. पहिला टप्पा शिर्षकामे व दुसरा टप्पा वितरण. पहिला टप्प्यातील निविदा कामे ही अंतीम टप्प्यात आहेत. सद्यस्थितीत निविदा स्विकृती समितीची बैठक झालेली असून इतिवृत मान्यता मिळाल्यानंतर शासनास सादर केल्यानंतर साधारणतः एक महिन्याचा कालावधी लागेल अशी अपेक्षा आहे. विस्तारित योजनाचे सर्व कामे (शीर्षकामे, वितरण व्यवस्था, CADA कामे) चार वर्षाच्या कार्यकालात पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

तसेच मूळ योजनेबरोबरच विस्तारीत योजनेची इतर कामांची निविदा कार्यवाही एक वर्षाच्या आत पूर्ण करणार आहोत. तरी निधीच्या उपलब्धतेनुसार चार वर्षात ही योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

१०) **श्री सुभाष गोबी, राहणार-तिकोंडी, तालुका-जत, जिल्हा-सांगली.**

प्रश्न- ह्या योजनेत जत तालुक्यातील ६५ गावांचा समावेश आहे. तर ६५ गावातील पाझर तलाव भरण्यास किती दिवस लागतील? तसेच या योजनेतून पाणी पुढे सोलापूर जिल्यातील मंगळवेढा, सांगोला येथे जाणार आहे. तर जत तालुक्यातील लोकांना पाणी मिळणार का? तेसुध्दा आपली योजना पूर्ण कार्यक्षमतेने चालणार का?

त्यांनी पुढे सांगितले की भविष्याचे २०-२५ वर्षांचे नियोजन करुन अस्तित्वात असणारे तलाव, भविष्यातील तलाव, पाझर तलाव हे सर्व भरण्यास किती दिवस लागतील, त्यात अंदाजे किती पाण्याची साठवण होईल. या ६५ गावांसाठी म्हैसाळमधूनच ( नदीमधून ) पाणी उपलब्ध होईल. आरगमधून ( मूळ योजनेच्या तिस-या टप्प्यामधून) पाणी येणार नाही हे आमचे मत आहे.

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की टप्पा दोन ते तीन मधील consumption आणि तिस-या टप्प्यातील विसर्ग या सर्वांचा अभ्यास झालेला आहे. त्यानंतर असे निदर्शनास आले की टप्पा ३ ला म्हैसाळच्या मूळ योजनेला ३१ क्युमेक्सचा विसर्ग लागतो, तो भागवून आणि आपल्याकडे ८.३१ क्युमेक्सचा विसर्ग उपलब्ध आहे. त्यातून आपण ७.२८ क्युमेक्सचा विसर्ग घेत आहोत. जरी आपण पाणी उचलले, तरी मूळ म्हैसाळ योजनेवर याचा कोणताही परिणाम होत नाही.

श्री गोबी यांनी मत मांडले की, ही योजना इतर २-३ तालुक्यांतून येत असल्यामुळे आम्हांला ही योजना मान्य नाही.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले मूळ म्हैसाळ योजनेच्या तिस-या टप्प्यातून बेडग कालव्यातून लगेच उचलत असल्याने व जत तालुक्यात पोहचेपर्यंत मध्ये पाण्याचा कोणताही उपसा करून पाणी देण्याचे नियोजन नाही त्यामुळे आपले म्हणणे चुकीच्या समजूतीवर आधारीत आहे तसेच प्रस्तावित म्हैसाळ विस्तारीत जत योजना ही पुर्णपणे फक्त जत तालुकयातील क्षेत्रासाठी नियोजित आहे.

११) **<u>श्री आप्पाराया बिराजदार, अध्यक्ष, जत तालुका काँग्रेस कमिटी.</u>**

प्रश्न- ६५ गावांना पाणी हे कॅनॉलव्दारे येणार का बंधिस्त पाईपलाईनमधून येणार आहे?

उत्तर- प्रकल्पाचे अधिकारी यांनी उत्तर दिले की, जत तालुक्यातील २६५०० हे. साठी सर्व योजना बंदिस्त वितरण नलिकेव्दारे होणार आहे.

१२) **श्री प्रविण तुकाराम अवराधी, युवासेना तालुका प्रमुख, रा. संख, ता-जत, जि-सांगली.**

प्रश्न- मी संखचा रहिवाशी आहे. संख गावासाठी सौर उर्जेचा जो प्रकल्प उभा करणार आहेत, तर जत तालुका हा भौगोलिकदृष्ट्या मोठा आहे. संख हा भविष्यात तालुका होण्याची शक्यता आहे. तर त्यासाठी गावात कार्यालयासाठी जागा उपलब्ध पाहिजे. त्यासाठी उपाययोजना करावी ही विनंती.

त्यांनी पुढे विचारले की तालुक्यात जेवढे तलाव आहेत, जेवढी साठवण तलावाची क्षमता आहे, त्यात किती पाणी साठवले जाईल व किती लोकांना याचा फायदा होईल हे सांगितले तर बरे होईल.

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले, सौर ऊर्जा प्रकल्पासाठी आवश्यक जागा जलसंपदा विभागाने यापुर्विच संपादित केली असुन अतिरिक्त जागेची आवश्यकता लागणार नाही तसेच तलावा संदर्भातील माहिती सर्वांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

१३) **श्री साहेबराव टोने, राहणार-गोंधळेवाडी,ता-जत, जि-सांगली.**

प्रश्न- आपण जी योजना राबवत आहात, त्या योजनमध्ये खाजगी जमीन सादरीकरणात ६००० हेक्टरदाखविलेली आहे. तरी जमिन ६५ गावांसाठी आहे की संपूर्ण म्हैसाळ प्रकल्पासाठी आहे याचा खुलासा करण्यात यावा.

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, सादरीकरणातील सदर जमीन यापूर्वीच्या ताकारी व मूळ म्हैसाळ प्रकल्पासाठी प्रस्तावीत भूसंपादन आहे नविन जत विस्तारीत प्रकल्पाराठी जत तालुक्यातील गल्लाळ येथील वितरण हौदा व्यतीरिक्त अन्य कोणतीही खाजगी जमीन लागणार नाही.

१४) **श्री बसवराज बिराजदार, तालुका-जत,जिल्हा-सांगली.**

प्रश्न- आम्हांला जास्त पाणी मिळालेच नाही. एवढ सगळे करुन पाईपलाईन जादा केलेयं. आताच्या घडीला कोणीही एक शेतकरी संतुष्ट नाही.

यावेळी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जरी ही सुनावणी पर्यावरणीय आहे, तरी आपला हा भावनिक प्रश्न आहे. गेले कित्येक वर्षे येथील सर्व जनता पाणी न मिळाल्याने त्रस्त आहे. म्हणून सर्वाच्या तीव्र भावनिक भावना ऐकून घेण्यात आल्या. त्या इतिवृत्तात समाविष्ट करण्यात येतील.

मा. अध्यक्ष यांनी सांगितले की मुळात संपादित क्षेत्राबाबत काही शंका/गैरसमज उपस्थित करण्यात आले पण त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे.

मा. अध्यक्ष यांनी सांगितले जसे जसे तलाव आहेत, त्यानुसारच आरेखन (डिझाईन) करण्यात आले असे स्पष्टीकरण प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले. तसेच काम सुरु झाल्यावर रस्त्यावरिल धूळ प्रचंड प्रमाणात उडते, त्यामुळे प्रदूषण होऊ नये म्हणून प्रकल्प प्रवर्तकांकडून उपाययोजना करण्यात याव्यात. प्रकल्प क्षेत्रातील सर्व तलावांची संपूर्ण माहिती ही स्थानिक जनतेस उपलब्ध करुन देण्यात यावी. जर गावातील एखादा तलावाचे नांव नसल्यास ग्रामस्थांनी त्याबाबत माहिती पुरविण्यात यावी.

मा. अध्यक्ष यांनी सांगितले की जशी येथील प्रत्येक व्यक्तीची सर्वांनाच पाणी मिळावे ही भावना आहे, त्याचप्रमाणे शासनाची सुद्धा हीच भावना आहे. स्थानिकांना तेथील परिसराची जास्त माहिती असते, शासकीय यंत्रणेपेक्षा. येथे योजना यशस्वी होण्यासाठी लोकसहभाग फार महत्वाचा आहे.

बैठकीत माननीय आमदारयांनी मूळ योजना कधी पुर्ण होईल व नविन योजना कधी पूर्ण होईल याबाबत प्रश्न विचारला, त्यास प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. प्रकल्प अधिकारी यांनी जनतेस तांत्रिकदृट्या प्रकल्प किती दिवसात पुर्ण होईल याबाबत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

दुसरा मुद्दा एकूण किती वीज आपण वापरणार ? सौर उर्जेतून किती वीज वापरणार?

उत्तर- प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सौर उर्जेतून ३९८ दशलक्ष युनिट आपण निर्माण करणार आहोत. लागते, आता जी सिस्टिम कार्यरत आहे, त्यानुसार ३९८ दशलक्ष युनिट लागते. तर जे पंप्स कमी क्षमतेने चालतात, त्यांच्यात सुधारणा करुन वापरावी लागणारी वीज ही ३९८ वरुन ३१८ दशलक्ष युनिट लागेल. व Consumption खाली येईल.

मा. अध्यक्ष यांनी सौर उर्जा प्रकल्पास किती जमिन (क्षेत्र) लागेल याबाबत विचारणा केली.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की जवळजवळ ७५० हेक्टर क्षेत्र जलसंपदा विभागाकडे आहे. त्यात २५० हेक्टर क्षेत्रात सोलर पॅनेल उभे करण्यात येत आहेत. त्यामुळे लोकांना येणार खर्च व शासनाची सबसिडी वाचेल. दूसरा प्रश्न हरितपट्टा.वन्यजीव संरक्षण व जैववेविधता याबाबत उत्तर अपेक्षित आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हरितपट्टा. वन्यजीव संरक्षण व जैववेविधता यासाठी सात कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यांनी सांगितले की प्रकल्प क्षेत्रात सहा वनराई असून त्यात विविध प्रकारचे पक्षी व प्राणी आहेत.

मा. अध्यक्ष यांनी विचारणा केली की सात कोटींमध्ये पाण्याचाही खर्च आहे का?

श्री बिराजदार यांनी सांगितले की जत तालुक्यात १७०० हेक्टर वनविभाग आहे. तेथे अनेक पशूपक्षी, वन्य प्राणी यांचा अधिवास आहे, त्यांना कुठेही पाणी पिण्याची सोय नाही.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की आपण शेततळे, पाझर तलाव व इतरही तलाव, यांना पाणी सोडणार आहोत. त्याचा उपयोग मनुष्यप्राण्यांबरोबरच इतरही प्राण्यांना होणार आहे.

मा. आमदार यांनी विचारले की, जी जैवविविधता करणार आहेत, ते कुठल्या भागात करणार आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हरितपट्टी निर्मिती ही मोकळ्या जागा, शाळा याठिकाणी करण्यात येईल.

मा. अध्यक्ष यांनी सांगितले की हरित पट्टा विकसनाच्या जागा ह्या निश्चित करण्यात याव्यात. तेथे हरितपट्टा विकसित करण्यात यावा.

तदनंतर श्री हुवाळे यांनी मागणी केली की, १७ गावे ही अंशतः व ४८ गावे ही पूर्णतः वंचित दाखविलेली आहेत. अंशतः हा शब्द वगळून ती पुर्णतः वंचित दाखविण्यात यावी अशी माझी प्रमुख मागणी आहे.

यावर प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, विस्तारीत योजनेमुळे योजनेतील सर्व ६५ गावांना पाणी मिळणार आहे,त्यामुळे योजनेत समाविष्ठ सर्व गावांना पाणी मिळणार आहे. प्रकल्पात पाझर तलाव, नैसर्गिक तलाव, साठवण तलाव भरण्याची तरतूद आहे.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सौर उर्जा प्रकल्पासाठी कोणतीही अतिरिक्त जमिन अधिग्रहित करण्यात येणार नाही. जल संपदा विभागाने संख मध्यम पाटबंधारे योजनेसाठी जी जमिन अधिग्रहित केलेली आहे, तेथेच प्रकल्प उभारण्यात येईल.

श्री बिराजदार यांनी परत सांगितले की आमच्या तालुक्यात ५०० हेक्टरपर्यंत वनीकरणाची जमिन आहे. त्याठिकाणी पशूपक्षी व वन्यप्राणी असून त्यांच्यासाठी कुठेही पाणी पिण्याची सोय नाही. तरी त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतुद करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

याबाबत नोंद घेण्यात येत असल्याबाबत प्रकल्प अधिका-यांनी सांगितले.

**श्री दिपक पाटील, रा.लोहगांव ता.जत जिल्हा-सांगली यांनी** आवाहन केले की येथील सर्व संबंधित ग्रामपंचायतीमध्ये लाख-दोन लाख वृक्षलागवड करण्यात येऊन त्याचे संवर्धनही करण्यात यावे.

१५) **<u>श्री एस. एस. वाली, राहणार-सोरडी, ता-जत, जि-सांगली.</u>**

प्रश्न- डोंगराळ भाग आहे. जेथे जेथे सौर उर्जा प्रकल्प कार्यान्वित करणे शक्य आहे, तेथे तेथे करण्यात यावे व सर्वांना पाणी द्यावे.

उत्तर- याबाबत नोंद घेण्यात येत असल्याबाबत प्रकल्प अधिका-यांनी सांगितले.

१६) **<u>श्री सुरेश काशीनाथ कटरे, उप सरपंच, तिल्याळ- ता-जत, जि-सांगली.</u>**

प्रश्न- २,२७,००० हेक्टर क्षेत्र तालुक्याचे क्षेत्र आहे. तर पाण्याचे क्षेत्र फक्त ५०,००० हेक्टर. याबाबत सविस्तर खुलासा करावा.

उत्तर- अध्यक्ष यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. अशा प्रकल्पातूनच पाण्याचे क्षेत्र वाढू शकते. शासनसुध्दा त्याच प्रयत्नात आहे. तरी उरलेल्या क्षेत्राबाबत आज उत्तर मिळणे शक्य नाही.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले, मूळ म्हैसाळ योजनेतील जत तालुक्यातील २२५०० हे. व विस्तारीत योजनेतून २६५०० हे. या क्षेत्रा व्यतीरिक्त अतिरिक्त क्षेत्र या प्रकल्पाद्वारे शक्य नाही.

श्री सुरेश काशीनाथ कटरे, यांनी मागणी केली की बैठकीच्या इतिवृत्तात पाझर तलाव, तलाव, लहान व मोठे बंधारे भरुन काढावेत अशी नोंद होणे गरजेचे आहे. अध्यक्ष यांनी संबंधित व्यक्तीस ग्रामपंचायतमार्फत गावातील तलावांची यादी प्रकल्प अधिका-यांनी देण्यात यावी अशी सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की लाभक्षेत्रातील तांत्रिकदृष्टया व पाणी उपलब्ध असलेने जिथे जिथे शक्य असेल तिथले तलाव असतील, तिथे पाणी सोडण्यात

येणार आहेत. लघुपाटबंधारे विभागाचे पाझर तलाव, तसेच लहान मोठे बंधारे आहेत, तेथे पाणी सोडण्यात येणार आहे.

१७) काही ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला की गरीब शेतक-याचे टेकडावर शेत असेल तर त्याला आपण पाणी देणार आहात काय?

यावर प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की टेकडावर जर शेत असेल, तर उर्ध्वपतनाने पाणी जाते, तेथेही आम्ही पाणी देत असतो. २६,५०० हेक्टर एवढे सिंचन क्षेत्र आहे. तर ८८३३३ हेक्टर क्षेत्रावर वितरण व्यवस्था करावी लागणार आहे. २६,५०० हेक्टर (सी.सी.ए. ८८३३३ हेक्टर) क्षेत्र आहे. त्यावेळी ही पर्यावरण जनसुनावणी असून तांत्रिक बाबतीतील सूचना, आक्षेप हे लेखी स्वरुपात त्या त्या विभागांना सादर करण्यात यावे असे तहसिलदार जत यांनी आव्हान केले.

१८) <u>श्री तुकारामबाबा महाराज, राहणार-गोंधळेवाडी, ता-जत, जि-सांगली.</u>

सादरीकरण होण्यापूर्वीच सांगण्यात आलेले आहे की ही जनसुनावणी पर्यावरणविषयक असल्याने फक्त पर्यावरणविषयक सूचना, प्रश्न विचारण्यात यावे. पुढे मला असे सांगावयाचे आहे की, माडग्याळ मधील कालव्यामधून व्हसपेठ तलावातून पाणी गुड्डापूर तलावात घेणे व ओढ्यामार्गे संख तलावात जावू शकते तसेच सोरडी तलावात पाणी सोडले तर पाणी पुर्वेला जाऊ शकते ही आमची पुर्वी पासूनची मागणी आहे तसेच ६७ गावांची माणसे आली आहेत का ? ४० गावांचीही माणसे नाहीत, आम्ही समाधानकारक नाही. आता ४० गावातील माणसांसाठी परत जनसुनावणी घेण्यात यावी.

यावर मा. अध्यक्ष यांनी सांगितले ईआयए अधिसूचनेनुसार, ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून जनतेच्या माहितीसाठी ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात जनसुनावणीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. आपण उपस्थित

केलेले मुद्दे हे तांत्रिक आहेत. त्यासाठी वेगळे लेखी निवेदन देण्यात यावे. त्या प्रत्येक मुद्याचे उत्तर प्रकल्प अधिकारी देतील.

श्री. तुकारामबाबा महाराज यांनी सांगितलेकी पर्यावरणाबाबत आमचा कोणाचाच कुठलाच आक्षेप नाही. आमचे हेच मागणे आहे की सर्वांना पाणी मिळावे. आमचे प्रश्न फक्त पाण्याचेच आहेत.

यावर मा. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की पूर्वीच्या प्रकल्पांच्या भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी यांना आढावा बैठक घेण्याची पत्र सादर करण्यात यावे.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांचे आभार मानले व त्यांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी आणखीन काही पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप असल्यास त्या नोंदवाव्यात, त्यास प्रकल्प प्रवर्तक, पर्यावरण सल्लागार स्पष्टीकरण देतील.

आयोजक, यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही जरी पर्यावरणविषयक असली तरीपण बैठकीत त्यांच्या संबंधित विषयांवर चर्चा झालेली आहे. सर्व उपस्थितांनी पोटतिडकीने पाणी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. गेले अनेक वर्षे येथील जनता दरवर्षीच्या दुष्काळाने त्रस्त आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी काय करावे याबाबत महत्वपूर्ण मार्गदर्शन मा. अध्यक्ष महोदय यांनी केले आहे .

प्रकल्प प्रवर्तकांनी सामाजीक बांधिलकी लक्षात घेऊन जनतेच्या सहभागाने हरित पट्टा विकसित करावा ही अपेक्षा अध्यक्षांनी व्यक्त केलेली आहे .बैठकीत अत्यंत सखोल आणि सविस्तर चर्चा झालेली आहे.

आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू योजनेविषयी स्थानिकांचे जे तांत्रिक मुद्दे आहेत, ते त्यांनी संबंधित विभागास लेखी स्वरुपात सादर करावेत, जेणेकरुन संबंधित विभागास पुढील कार्यवाही विनाविलंब करणे शक्य होईल.

आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व मा. अध्यक्षांच्या संमतीने सदरहू इतिवृत्त, सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त लेखी सूचना/आक्षेप इत्यादी मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे ,प्रकल्प प्रशासनाचे ,शासकीय अधिकारी ,पोलिस प्रशासन यांचे आभार मानले व मा .अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपल्याचे घोषित केले.

सदरच्या सुनावणीची कार्यवाही सकाळी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी ०३.३० वाजता समाप्त झाली.

( नवनाथ सं. अवताडे )
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली

( जगन्नाथ शं. साळुंखे )
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

( विजयसिंह पाटील )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली.